रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १५३ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# साईनाथ पवार यांनी लाखोंचा घोळ केला - प्रमोद तोतला

## हिम्मत असेल तर सर्वसाधारण सभा लावून सभासदांचे शंका निरसन करा - संजय बोबडे

**जालना । प्रतिनिधी -** साईनाथ पवार यांनी एका वृत्तपत्रात हास्यास्पद खुलासा केला. त्यांना जनाची नाही तर मनाची तरी थोडी लाज वाटायला पाहिजे. विषय केमिस्ट हॉल, वार्षिक सर्वसाधारण सभा, व हिशोबाचा आहे. यासह अन्य अनेक विषय आहेत.परंतु नेहमीप्रमाणे सभासदांची दिशाभूल करणारा खुलासा त्यांनी केला असल्याचा आरोप करत त्यांनी लाखोंचा घोळ केला असल्याचे प्रमोद तोतला यांनी म्हटले असून हिम्मत असेल तर सर्वसाधारण सभा घेऊन सभासदांच्या शकांचे निरसर करण्याचे आवाहन संजय बोबडे यांनी दिले आहे. आता यावर साईनाथ पवार काय भूमिका घेतात हे लवकरच स्पष्ट होईल.

हॉल विषयी सांगतांना श्री तोतला यांनी म्हटले आहे की, २०१३ ला निवडून आल्यानंतर तुमची वाकडी नजर ७ हजार चौफूट असलेल्या व ३.५ कोटी रु किंमत असलेल्या हॉल वर टाकली. माझ्या नावावर रजिस्टर्ड लीजडीड आहे. ती तुमच्या नावावर करावी म्हणून तुम्ही मला २०१५ मधे २ पत्र दिले व ट्रान्सफर साठी बॉण्ड माझ्याकडे पाठवले. ते मी धुडकावून लावले कारण प्रॉपर्टी सभासदांची आहे व मी त्यावर विश्वस्त म्हणून संघटनेच्या नावाने घेतली आहे. तुम्हाला वार्षिक सभेत ठराव घ्या म्हणून सांगितले पण सभा लावली नाही कारण कुणीही तुमच्या नावाने सकारात्मक निर्णय देणार नाही याची तुम्हाला खात्री होती. नियमाप्रमाणे तुम्ही त्या प्रॉपर्टी ची देखभाल करावी म्हणून आम्ही मार्केट कमिटीला तसे पत्र दिले. नंतर त्या पत्राचा गैरफायदा घेत ती प्रॉपर्टी हडपण्याचा कुटील डाव रचला. आ. अप्पांना खोटी माहीती देऊन हॉल कुणी भाड्याने घेण्यास तयार नाही असा कांगावा केला व प्रॉपर्टी चे मालक असल्यागत स्वतःच्या मुलाच्या नावाने रजिस्टर्ड लिज डिड करून दिली. त्यामध्ये २/३: महिला असल्यामुळे आम्ही ती लिजडीड सार्वजनिक केली नाही. हि लिजडीड करतांना वार्षिक सर्वसाधारण सभा घेऊन निर्णय का घेतला नाही. सभासदांच्या मालकीच्या असलेल्या प्रॉपर्टी चे तुम्ही कधीपासून मालक झाले?. १ लाख भाडे मिळत असताना स्वार्थापोटी ५० हजार महिन्यात कशी काय लिजडीड बनवली? तुम्ही म्हणता हॉल सोडला अहो महाशय मार्केट कमिटी कडे तक्रार करून आम्ही कॅन्सल करायला लावली. तुम्हाला मजबुरीने गिळणकृत केलेला हॉल सोडावा लागला. तुमच्या घशातून काढून परत सभासदांच्या हक्कात हॉल आम्ही खेचून आणला. नाहीतर कायमस्वरूपी तो गेलाच होता. बरं आता जसं एक पत्र काढून खुलासा केला तशीच मेहेरबानी केमिस्ट बांधवांवर करा, एक पत्र काढा त्यामध्ये वार्षिक सभा व १३ वर्षांचा हिशोब कधी देणार ते जाहीर करा असे आवाहन देखील श्री तोतला व श्री बोबडे यांनी केले आहे.

**५ कोटींच्या जुन्या प्रॉपर्टी बाबत**

संघटनेचे भूतपूर्व अध्यक्ष रामस्वरूपजी मंत्री, सुरेश सेठ मंत्री, व सुधीरसेठ मंत्री यांच्या कार्यकाळात नरिमन नगर येथील ६000 चौ फुटाचा प्लॉट व सिटीएमके शाळेसामोरील ४000 चौ फुटाचे २ हॉल जे न्यायप्रविष्ठ होते २०१३ पर्यंत आम्ही लढा दिला, त्यानंतर तुम्ही विरोधकांशी हात मिळवणी करत काय जांगडगुत्ता केला तुम्हालाच माहित आणि त्या दोन्ही प्रॉपर्टी विरोधकांच्या घशात घालून लाभार्थी झाले.

**वार्षिक सर्वसाधारण सभेबाबत**

२०१३ ला निवडून आल्यानंतर २०२६ पर्यंत एकही वार्षिक सर्वसाधारण सभा घेतली नाही. सभा घेतली तर सभासदांच्या प्रश्नांची उत्तरे द्यावी लागतात, हिशोब द्यावा लागतो. हे सर्व टाळण्यासाठी तुम्ही १३ वर्षात सभाच घेतल्या नाहीत. सभासदांच्या मूलभूत हक्काची पायमल्ली केली. किती हे दुष्कर्म.



प्रमोद तोतला



संजय बोबडे

**आर्थिक व्यवहारा बाबत**

बँक खात्यामध्ये व्यवहार करतांना फक्त अकाउंटचाच चेक द्यावा लागतो. परंतु या महाशयानी किंवा दुसऱ्या पदाधिकाऱ्यांच्या नावाने बेअरर चेक दिले. यामधे लाखोंचा घोळ झाला आहे. एका कॅटरिंग वाल्याच्या बिल चे पेमेंट करण्यासाठी १ लाख रु काढले त्याला ५0,000 रुपये दिले बाकीचे पन्नास हजार रु हडप केले. असे अनेक किस्से आहेत. या सर्व बाबी मी पुराव्यानिशी सर्वसाधारण सभेत मांडणार आहे. १३ वर्षांचे ताळेबंद दिले नाहीत. मागण्यांचा खच पडला पण काही उपयोग झाला नाही. कारण लोकांना विसरायला लावायचे होते. रात्री काय जेवले ते सकाळी लक्षात राहात नाही. आता दिला तरी कुणाला काय कळणार हा त्यांचा गोड गैरसमज असेल. पण आम्ही जागरूक आहोत. इंग्रजी मधे एक म्हण आहे जस्टिस डिले इज जस्टिस डिनायड. **पवार यांचा कार्यकाळ म्हणजे भर अब्दुल्ला गुड थैली में** श्री बोबडे, जितेंद्र लखोटीया म्हणतात सर्व काही नियमाप्रमाणे चालले. अहो साहेब तुम्हाला साधं पत्र घेण्याचा अधिकार नाही, सर्कुलर काढण्याचा अधिकार नाही, गुपचूप सांगितल्याप्रमाणे सह्या कराव्या लागतात. एका वर्षात किती होलसेलरला किती एजन्सी लाईन्स दिल्या याचा हिशोब द्यावा. फक्त आरोग्य अमृत एलएलपी ला ३५ एजन्सी लाईन्स देण्यासाठी तुम्ही सह्या करता का? अनेक प्रश्नांची उत्तरे तुम्हाला द्यायची आहेत. तुम्ही म्हणता नियमाप्रमाने चालू आहे महाशय निवडणूक किती वर्षांनी होते? ३ वर्ष की १० वर्षांनी?. हिम्मत असेल तर सभा लावा. सभासदांच्या हक्काचा गळा घोटला ते पाप तुम्ही लोकं कुठे फेडणार. खोटं बोल पण रेटून बोल हि सवय तुम्हाला सुद्धा लागली आहे. असो तरी पण आम्ही आमच्या सर्व सभासदांचा हक्क मिळवल्याशिवाय थांबणार नसल्याचा पावित्राही श्री तोतला व इतरांनी घेतला आहे.

# थकबाकी न भरणाऱ्या मालमत्ता धारकांवर जप्तीची कारवाई; ५ पथकांची नियुक्ती

## अभय योजनेअंतर्गत शास्तीवर ५० टक्के सूट; २८ फेब्रुवारीपर्यंत मुदत

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिकेच्या हद्दीतील थकबाकीदार मालमत्ता धारकांकडून मालमत्ता कराची वसुली प्रभावीपणे करण्यासाठी आता कठोर पावले उचलण्यात येणार आहेत. जे नागरिक मालमत्ता कराची थकबाकी भरणार नाहीत, त्यांच्यावर थेट जप्तीची कारवाई करण्याचे आदेश माननीय आयुक्त श्रीमती आशिमा मित्तल यांनी दिले आहेत. याबाबतचा निर्णय आज झालेल्या कर वसुली आढावा बैठकीत घेण्यात आला.




महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होऊन शहरातील विकासकामांना गती मिळावी, या उद्देशाने वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी प्रशासन सज्ज झाले असून, जप्तीची कारवाई राबवण्यासाठी ५ स्वतंत्र पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही पथके शहरातील वि विध भागांत फिरून थकबाकीदार मालमत्ता धारकांवर थेट कारवाई करणार आहेत.

दरम्यान, नागरिकांना दिलासा देण्यासाठी महानगरपालिकेच्या 'अभय योजने' अंतर्गत थकबाकीवरील शास्तीमध्ये (दंडामध्ये) ५० टक्के सूट देण्यास २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांनी या संधीचा लाभ घेऊन त्वरित आपली थकबाकी भरावी, असे आवाहन आयुक्तांनी केले.

बैठकीत बोलताना आयुक्त आशिमा मित्तल म्हणाल्या की, मालमत्ता कराची वेळेवर वसुली झाल्यास शहरातील रस्ते, नाल्या, पाणीपुरवठा व्यवस्था, स्वच्छता, आरोग्य सेवा आदी मूलभूत सुविधांच्या विकासकामांना निधी उपलब्ध होतो. त्यामुळे प्रत्येक मालमत्ता धारकाने आपली जबाबदारी ओळखून कर भरणे आवश्यक आहे. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त श्री. अर्जुन गिराम, सहायक आयुक्त श्रीमती अपर्णा जाधव, कर अधिकारी श्री. राहुल देशमुख यांच्यासह सर्व कर निरीक्षक व वसुली लिपिक उपस्थित होते. महानगरपालिकेने जालना शहरातील सर्व मालमत्ता धारकांना आवाहन केले आहे की, जप्तीची कारवाई टाळण्यासाठी थकबाकी त्वरित भरून शहराच्या विकासात सहकार्य करावे.

# मंठ्यातील अवैध धंद्यांना सात दिवसांत लगाम लावा अन्यथा शिवसेना स्टाईलने आंदोलन

## उदयसिंह बोराडे यांचा इशारा; पोलीस अधीक्षक बन्सल यांना निवेदन; पोलीस प्रशासनावर छुप्या पाठिंब्याचा आरोप

**जालना । प्रतिनिधी -** ''सदरक्षणाय खलनिग्रहणाय'' हे पोलिसांचे ब्रीदवाक्य असले, तरी मंठा शहरासह संपूर्ण तालुक्यात खुलेआम सुरू असलेले मटका, गुटखा, लॉटरी, क्लब जुगार, अवैध मद्यविक्री, वेश्याव्यवसाय तसेच जिथे जात नाही औषधे तिथे जाते देशी अशी अवस्था असल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर मंठा तालुका शिवसेनेच्या वतीने शुक्रवारी (दि.३१) सर्व शिवसैनिकांनी एकत्र येत जालना येथे पोलीस अधीक्षक कार्यालयात धडक देत पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बन्सल यांना निवेदन सादर केले.

निवेदनात शिवसेना तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांनी गंभीर आरोप करत सांगितले की, मंठा पोलीस स्टेशन हद्दीत अवैध धंदे खुलेआम सुरू असून अवैध व्यवसाय करणारी मंडळी दिवसभर पोलीस स्टेशन परिसरात वावरत असतात. काही पोलीस निरीक्षक व कर्मचारी अवैध धंद्यांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत करीत असल्याचा संशय व्यक्त होत आहे. वरिष्ठांना मात्र 'सर्व अवैध धंदे बंद आहेत' असा खोटा अहवाल सादर केला जातो, असा आरोपही निवेदनात करण्यात आला.

शिवसेनेच्या म्हणण्यानुसार, पोलीस स्टेशनपासून हाकेच्या अंतरावर मटका घेतला जातो, मटका घेणारे व खेळणारे व्यक्ती पोलिसांना माहित असतानाही त्यांच्यावर कारवाई होत नाही. या मटक्यामुळे शहरी व ग्रामीण भागातील अनेक कुटुंबे आर्थिक संकटात सापडली असून काही ठिकाणी आत्महत्येसारख्या टोकाच्या घटना घडत असल्याचेही शिवसेनेने निदर्शनास आणून दिले.

**सात दिवसांचा अल्टीमेटम**



या पार्श्वभूमीवर शिवसेना तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांनी पोलीस प्रशासनाला सात दिवसांचा अल्टीमेटम देत स्पष्ट शब्दांत इशारा दिला की, ''जर सात दिवसांच्या आत मंठा तालुक्यातील अवैध धंद्यांना पूर्णपणे लगाम बसला नाही, तर शिवसेना 'स्टाईल'ने रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करेल. त्याची सर्वस्वी जबाबदारी पोलीस प्रशासनाची राहील.''

**काय मागणी?**

मंठा तालुक्यातील सर्व अवैध धंदे तत्काळ बंद करावेत. अवैध धंद्यांना मदत करणाऱ्या पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांची चौकशी करून कडक कारवाई करावी. नियमित छापे, गुप्त माहितीच्या आधारे कारवाई व स्वतंत्र विशेष पथक स्थापन करावे.

**शिवसेनेची ठाम भूमिका**

यावेळी उपजिल्हाप्रमुख योगेश गणगे, भगवान गायकवाड, तालुकाप्रमुख रामराव वरकड, उपतालुकाप्रमुख अक्षयदीप वाघमारे, योगेश पाटील अवचार, शिवसेना महिला आघाडी प्रमुख सुनिताताई देशमुख, कासाबाई शिरगुळे यांच्यासह तालुक्यातील अनेक शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. शिवसेनेने स्पष्ट केले की, अवैध धंद्यांमुळे तरुण पिढी बरबाद होत असून समाजातील शांतता व सुव्यवस्था धोक्यात येत आहे. त्यामुळे हा लढा केवळ पक्षीय नसून, सर्वसामान्य नागरिकांच्या भवितव्यासाठी आहे.

# महाराष्ट्राची लोककला आता सुरक्षित हाती

## नव्या दमाच्या शाहिरांनी गाजवले व्यासपीठ!; जेईएस महाविद्यालयात शाहिरी प्रशिक्षण शिबिराचा समारोप

**जालना । प्रतिनिधी -** ज्या शाहिरीने महाराष्ट्राचा इतिहास घडवला आणि समाजमनावर अधिराज्य गाजवले, त्याच शाहिरी परंपरेचा नवा हुंकार नुकताच जालन्यात अनुभवायला मिळाला. निमित्त होते, सांस्कृतिक कार्य संचालनालय (महाराष्ट्र राज्य) आणि जेईएस महाविद्यालयाचा लोककला विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शाहिरी प्रशिक्षण शिबिराच्या सांगता समारंभाचे. यावेळी प्रशिक्षणार्थींच्या पहाडी आवाजातील पोवाड्यांनी संपूर्ण सभागृह अक्षरशः दुमदुमून गेले.

कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक 'गण' सादर करून विद्येच्या देवतेला वंदन करून झाली. शिबिरार्थी नेहा खंडागळे हिने जेव्हा शिवजन्माचा पोवाडा सादर केला, तेव्हा छत्रपतींच्या जन्माचा इतिहास डोळ्यांसमोर जिवंत झाला. तसेच बालशाहीर स्वानंद धुमाळ आणि अजय काटे यांच्या सादरीकरणाने सभागृहात शौर्य आणि स्फूर्तीचे चैतन्य निर्माण केले. या शिबिरातून महाराष्ट्राच्या संस्कृतीचा वारसा नव्या पिढीच्या खांद्यावर यशस्वीपणे सोपवला गेल्याची प्रचिती उपस्थितांना आली.




या सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून ढोलकी सम्राट पांडुरंग घोटकर आणि शाहीर रत्न रमेश गिरी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जालना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष पुरुषोत्तमजी बगडिया होते. यावेळी लोकशाहीर आप्पासाहेब उगले, प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, मराठी विभाग प्रमुख डॉ. यशवंत सोनूने, शाहीर रामानंद उगले आणि शिबिर समन्वयक प्रा. कल्याण उगले यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रसिद्ध शाहीर रत्न रमेश गिरी यांनी आपल्या भाषणात अत्यंत मार्मिक टिप्पणी केली. ते म्हणाले, शाहिरी हा महाराष्ट्राच्या मातीचा खरा सुगंध आहे. आजच्या पाश्चिमात्य प्रभावाच्या काळात आपली लोककला टिकवण्यासाठी असे उपक्रम म्हणजे अमृताची संजीवन देण्यासारखे आहेत.

ढोलकी सम्राट पांडुरंग घोटकर यांनीही शिबिरार्थींच्या लय आणि तालाचे विशेष कौतुक केले.

अध्यक्षीय भाषणात पुरुषोत्तमजी बगडिया यांनी लोककलेच्या जतनासाठी संस्था नेहमीच पाठीशी राहील, अशी ग्वाही दिली. यावेळी सर्व यशस्वी शिबिरार्थींना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रे देऊन गौरवण्यात आले. शाहीर महर्षी आत्माराम पाटील यांच्या 'प्रिय आई हिंदभूमी' या भैरवीने या भारदस्त सोहळ्याची सांगता झाली.

कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन शाहीर माधवी माळी यांनी केले, तर समन्वयक प्रा. कल्याण उगले यांनी शिबिराचा सविस्तर आढावा मांडला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री आणि लोककला विभागाच्या अथक परिश्रमामुळे हे शिबिर यशस्वी झाले. या सोहळ्याला जालना परिसरातील ज्येष्ठ कलावंत आणि रसिक प्रेक्षकांनी मोठी गर्दी केली होती.

# कै सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालयात गांधी विचार संस्कार परीक्षेचे आयोजन




**परभणी । प्रतिनिधी -** कै सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालयात महात्मा गांधी यांची स्मृतिदिन व हुतात्मा दिनानिमित्त गांधी विचार संस्कार परीक्षा २०२६ यशस्वीपणे पार पडली. महिला महाविद्यालयात दिनांक ३० जानेवारी २०२६ रोजी महात्मा गांधी यांच्या ७८ व्या स्मृतिदिनानिमित्त गांधी विचार संस्कार परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. महात्मा गांधीजींच्या जीवन मूल्यांची ओळख विद्यार्थिनींना व्हावी, गांधीजींचे विचार व कार्य विद्यार्थिनींना समजावेत या उद्देशाने ५० गुणांची परीक्षा घेण्यात आली. महाविद्यालयातील ६२ विद्यार्थिनींनी या परीक्षेत सहभाग घेतला. या परीक्षेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामचंद्र भिसे सर यांचे मार्गदर्शन लाभले. समन्वयक म्हणून इतिहास विभाग प्रमुख डॉ. महेश जाधव यांनी काम पाहिले. या परीक्षेसाठीच्या यशस्वितेसाठी डॉ. प्रवीण नादरे, डॉ. गणेश जाधव यांनी परीक्षा नियोजनबद्ध पार पाडण्यासाठी सहकार्य केले.